सायंदैनिक
# नाशिक लोकशास्त्र
PRGI No. MHMAR/25/A4847
संपादक : भाऊसाहेब हुजबंद मो.८९९९९२१९९४ Email : bmhujband@gmail.com
* नाशिक आवृत्ती * वर्ष – पहिले * अंक क्र. – १७० * बुधवार, दि. २४ जून २०२६ * पाने – ४ * किंमत – एक रूपया

# एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी व्यापक धोरण राबविणार - मंत्री आदिती तटकरे

## एकल महिला दिनानिमित्त जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**नाशिक लोकशास्त्र ...**

मुंबई, दि. २३ : राज्यातील अंदाजे ५० ते ५५ लाख एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यांच्या हितसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

महिला व बाल विकास विभाग, मुंबई शहर यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात 'एकल महिला दिन' तसेच प्रस्तावित 'एकल महिला धोरण' यानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.




यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या उपस्थितीत महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी एकल महिला धोरणाचे महत्त्व, कार्यशाळेची उद्दिष्टे आणि धोरण निर्मितीची प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेत विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विभागाच्या लाभार्थी महिला तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, महिला धोरण आणि एकल महिला धोरण हे काळानुरूप बदलणारे व लोकाभिमुख असेल. महिलांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, अभिप्राय आणि गरजांच्या आधारे त्यामध्ये आवश्यक बदल करण्यात येतील. एकल महिलांसाठी सुरक्षित निवारा, कौशल्य विकास व प्रशिक्षण केंद्रे, घर व जागेसंदर्भातील सवलती तसेच घरेलू हिंसाचाराशी संबंधित प्रकरणांचा जलद निपटारा यासाठी विविध शासकीय यंत्रणांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय विधवा दिना' ऐवजी महाराष्ट्र शासनाने 'एकल महिला दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, राज्यातील एकल महिलांच्या समस्या, गरजा आणि हक्क यांवर केंद्रित स्वतंत्र धोरण तयार करण्यासाठी महिला व बाल विकास विभाग सक्रियपणे कार्यरत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

आई वडिलांच्या नावाचा संयुक्त उल्लेख, 'विधवा दिना'ऐवजी 'एकल महिला दिन' ही संकल्पना आणि एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण या निर्णयांमागे व्यापक सामाजिक परिवर्तनाचा दृष्टिकोन असल्याचे त्यांनी नमूद केले. 'एकल महिला' ही ओळख महिलांनी अभिमानाने स्वीकारावी आणि 'विधवा' हा शब्द हळूहळू वापरातून कमी व्हावा, हीच या उपक्रमामागील भूमिका असल्याचे त्या म्हणाल्या.

आदिशक्ती अभियानाचा उल्लेख करताना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यात आतापर्यंत २४ हजारांहून अधिक आदिशक्ती समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत गावपातळीवर कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना, शाळाबाह्य मुलींची संख्या, विधवांची परिस्थिती, मुलींच्या उच्च शिक्षणाची स्थिती तसेच महिलांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांच्या लाभांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

प्रत्येक आदिशक्ती समितीच्या अध्यक्षपदी महिला असून, निवृत्त पोलीस अधिकारी किंवा शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, आरोग्य सेविका तसेच स्वच्छता क्षेत्रातील महिला कार्यकर्त्या सदस्य म्हणून कार्यरत आहेत. या माध्यमातून शासकीय यंत्रणा आणि स्थानिक समाज यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. पहिल्याच वर्षात इतक्या मोठ्या संख्येने समित्या कार्यरत होणे हे ग्रामीण भागातील महिलांच्या नेतृत्वक्षमतेचे आणि सहभागाचे द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले.

बालविवाह प्रतिबंधासाठी आदिशक्ती समित्यांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत असून, रोखण्यात आलेल्या बालविवाहांची तसेच नोंदविण्यात आलेल्या प्रकरणांची माहिती संकलित केली जात आहे. या माहितीच्या आधारे विभागाकडून पुढील धोरणात्मक निर्णय घेतले जात असल्याचेही मंत्री तटकरे यांनी सांगितले.

****

## उन्नत नाशिक अभियान
## नाशिक शहर परिसरात २८ पासून हरित कुंभ– हरित मॉन्सून उपक्रम

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक, दि. २३ (जिमाका वृत्तसेवा) : 'उन्नत नाशिक अभियान' आणि नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर आणि परिसरात 'हरित कुंभ– हरित मॉन्सून उपक्रम २८ जून ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत एक लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली आगामी कुंभमेळा हरित, स्वच्छ, पर्यावरणपूरक असा राहील, असे नियोजन करण्यात आले आहे. नाशिक शहर आल्हाददायी वातावरणासाठी राज्यात प्रसिद्ध आहे. नाशिक शहराची राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर एक वेगळी ओळख निर्माण होण्याच्या उद्देशाने 'स्वच्छ, हरित व सुंदर नाशिक' या संकल्पनेवर आधारित 'उन्नत नाशिक अभियान' ही व्यापक स्वरूपाची आणि लोकसहभाग असलेली लोकचळवळ राबविण्यास महाराष्ट्र दिनापासून म्हणजेच एक मेपासून सुरुवात झाली आहे.

या अभियानांतर्गत नाशिक शहर व परिसरात 'हरित कुंभ– हरित मॉन्सून' या उपक्रमाच्या माध्यमातून एक लाख वृक्ष लागवडीचा निर्धार करण्यात आला आहे. याबरोबरच स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि हरित उपक्रमावर भर देण्यात आला आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून महानगरपालिका क्षेत्रात १७ मे रोजी चार हजारांपेक्षा अधिक देशी जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे, तर जागतिक पर्यावरण दिनी म्हणजेच पाच जून रोजी शहरातून वाहणाऱ्या नंदिनी नदी स्वच्छतेसाठी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. या अभियानात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. त्यासाठी पद्मश्री राहिबाई पोपेरे यांची मदत घेतली जात आहे. नाशिक शहर परिसरात पर्यावरण पूरक उपक्रम राबवून नाशिक शहराला 'हरित शहर' बनविण्यासाठी व्यापक आराखडा तयार करण्यात येत आहे. त्यातून नाशिक शहराला राष्ट्रीय सर्वेक्षणांमध्ये उच्च स्थान मिळवून देणे आणि पर्यावरण, स्वच्छता व वायू गुणवत्तेमध्ये संतुलित प्रगती साधणे हा आहे.

# एकल महिलांच्या सक्षमीकरण धोरणासाठी सूचनांना प्राधान्य : विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक, दि. २३ जून (जिमाका वृत्तसेवा): राज्य शासनामार्फत एकल महिलांच्या विविध समस्या, अडचणी व गरजा लक्षात घेऊन सर्वसमावेशक धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धोरण निर्मितीत एकल महिलांचे अनुभव, सूचना व अपेक्षा महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. त्यामुळे एकल महिलांनी आपल्या समस्या व सूचना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाचे विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे यांनी केले.



जिल्हा परिषदेच्या सभागृहात जिल्हा परिषद व महिला व बाल विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकल महिला दिन कार्यक्रमात विभागीय उपायुक्त श्री. पगारे बोलत होते. यावेळी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील दुसाने, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी सचिन शिंदे, कौशल्य विकास अधिकारी सिद्धार्थ पवार, मुख्य महिला सत्काराार्थी दीपाली बागले, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक उल्हास पाटील, सामाजिक कार्यकर्ते राजू शिरसाठ, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार यांच्यासह, विविध शासकीय विभागांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व एकल महिला उपस्थित होत्या.

विभागीय उपायुक्त श्री. पगारे म्हणाले की, राज्य शासनाने २३ जून हा दिवस एकल महिलांच्या प्रश्नांवर व्यापक चर्चा घडवून आणण्यासाठी निश्चित केला आहे. राज्यभर विविध स्तरांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामागील प्रमुख उद्देश म्हणजे एकल महिलांच्या जीवनातील वास्तव समजून घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणारे धोरण तयार करणे हा आहे. जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या 'नवचेतना' अभियानामुळे एकल महिलांच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळाले आहे. या क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे हा विषय शासनाच्या धोरणात्मक पातळीवर पोहोचला आहे.


कार्यक्रमात सहभागी महिलांनी उच्च शिक्षणासाठी शुल्क सवलत, व्यावसायिक शिक्षणासाठी विशेष आर्थिक मदत, तालुकास्तरावर समुपदेशन केंद्र, कायदेशीर मार्गदर्शन सुविधा, मालमत्ता हक्कांचे संरक्षण आणि शासकीय योजनांमध्ये अधिक प्राधान्य अशा विविध सूचना मांडल्या आहेत. शासनाकडून या सर्व सूचनांचा गांभीर्याने विचार करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. एकल महिलांनी कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीपासून सावध राहावे, तसेच केवळ विश्वासार्ह व नोंदणीकृत संस्थांशी संपर्क ठेवावा. शासनाच्या विविध यंत्रणा आणि विभाग महिलांच्या मदतीसाठी कटिबद्ध असून त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

****

# आजची तरुणाई उद्याच्या भविष्याचे शिल्पकार

**नाशिक लोकशास्त्र...**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आजची तरुणाई भरकटत चालली असून दिवसेंदिवस तरुणाई व्यसनाधिनतेच्या व मोबाईलच्या आहारी जात आहे. मोबाईलचा दिवसेंदिवस वाढत चाल-लेला वापर हा तरुणाईसाठी भविष्य काळात अधोगतीला नेण्याकडे झुकतो आहे. प्रत्येकाने आपल्या घरातील लहान मुलांपासून मोबाईल दूर ठेवणे व त्यांच्या हातात मोबाईल न देता त्यांना सुसंस्कारीत कसे करता येईल ? यावर आई वडील व घरातील सदस्यांनी लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे. स्वत:ला आ-ळखून व्यक्तीमत्व विकासासाठी आयुष्यात चांगल्या विचारांची आवश्यकता आहे. आजची व्यसनाधीन तरुण पीढी पाहीली की खुप वाईट वाटते. प्रत्येक आई वडीलांना वाटत असते की,आपल्या मुलाने चांगले शिक्षण घेऊन आपल्या गावाचा, परिवाराचा व घराचा तसेच आपल्या आई-वडिलांचा नावलौकिक वाढवावा. त्यांनी आई-वडिलांचा मान राखून त्यांना सन्मान दिला पाहिजे त्याचबरोबर वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या संतांचा अभ्यास करून संत विचार आत्मसात करावे. आजच्या तरुणांनी जीवनात कितीही प्रतिकूल परिस्थिती आली तरी संघर्ष करत आपला जीवन क्रम चालू ठेवणे महत्वाचा आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये समस्या आहेत परंतु त्या समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करण्याची गरज आहे समस्या नाही असा एकही व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. आजची तरुणाई उद्याच्या भविष्याचे शिल्पकार असून त्यांनी व्यसनापासून दूर राहून तणावमुक्त जीवन जगले पाहिजे. जीवनात आपणच आपले गुरू व्हायला शिकले पाहिजे. स्वताला आ-ळखून आपल्या अंगी असलेले उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न केला तरच स्वत:चा सर्वांगीण विकास करता येईल.स्वत:वरील आत्मविश्वास कधीच कमी होऊ न देता जीवनात आलेल्या सर्वांशी चांगले बोला, चांगले वागा आपल्या आयुष्यात बदल घडवायला शिका, बदल घडविणे हे आपल्याच हातात आहे. चांगल्या मित्रांची संगत धरा, चांगल्या लोकांच्या संगतीत राहील्यास चांगलेच होते. कठीण काळात ज्यांनी साथ दिली अशांचे आभार माना. जीवनात असा कोणताच माणुस नाही की ज्याच्या जीवनामध्ये चढ उतार आले नाहीत. फक्त परीस्थितीचा सामना करता आला पाहिजे. आपणच आपल्या जी-वनाचे भाग्यविधाते आहोत हे कधी विसरू नका. मी करू शकतो हा जीवन-ाचा मुलमंत्र आहे. अनेक सुशिक्षित तरूण आपले स्थान निर्माण करण्यासाठी झगडत असतात. त्यासाठी चांगल्या विचारांची कास धरा. प्रामाणिकपणा आणि कष्ट या दोन गोष्टींचा अंगिकार करावा. परमेश्वराने आपल्याला हे सुंदर जीवन दिले आहे. परेश्वराचे खरोखर आभार माना. आपण चांगलं वागले तर चांगलेच होते. आपल्या स्वभावात बदल करता आला पाहिजे. मी मोठा की तु मोठा असा भेदभाव न करता सर्वांशी प्रेमाने वागा. जेव्हा आपण दुसर्यांशी चांगले वागु तेव्हाच आपले जीवन सुखकर होईल. आपलं आयुष्य खुप सुंदर सुखी आहे. ते आणखी कसे सुंदर बनवता येईल याकडे पहा. एखाद्या व्यक्तीला पाहून जगण्याची ऊर्मी मिळाली पाहिजे. आयुष्यात चांगल्या माणसांची संगत खुप महत्वाची आहे. चांगल्या व्यक्ती आपल्या जीवनात नक्कीच प्रेरणा देतात मार्गदर्शन करतात.



**रामभाऊ आवारे**
**प्रदेश प्रसिद्धीप्रमुख-वारकरी मंच महाराष्ट्र राज्य**

रामभाऊ आवारे
प्रदेश प्रसिद्धीप्रमुख वारकरी मंच महाराष्ट्र राज्य

# अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एडीवायपीयू यांच्याकडून इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक प्रोग्राम लाँच

## ४ वर्षांचा रेसिडेन्शियल (निवासी) प्रोग्राममध्ये यूजीसी-मान्यताप्राप्त पदवीसह इंडस्ट्री-इंटिग्रेटेड एआय इंजिनिअरिंग शिक्षणाचे संयोजन

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक : अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी आज चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रोग्राम लाँच करण्यासाठी धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली. विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून उद्योग-संबंधित एआय इंजिनिअरिंग कौशल्यांसह यूजीसी मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यासाठी हा प्रोग्राम डिझाइन करण्यात आला आहे. पारंपारिक इंजिनिअरिंग शिक्षण आणि एआय-चालित कार्यक्षेत्रातील झपाट्याने बदलणाऱ्या गरजा यांमधील वाढती तफावत दूर करणे या प्रोग्रामचा मुख्य उद्देश आहे. या प्रोग्रामची पहिली बॅच ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ मध्ये सुरू होणार आहे.

कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून (सीबीएसई, आयसीएसई किंवा राज्य मंडळे) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांमध्ये किमान ५० टक्के गुणांसह इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत.

या सहयोगांतर्गत, अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी कॅम्पस पायाभूत सुविधा, निवासी शिक्षण वातावरण प्रदान करेल आणि यूजीसी-मान्यताप्राप्त बी.टेक पदवी बहाल करेल. यूजीएसओटी एडीवायपीयूसोबत सहयोगाने इंडस्ट्री-इंटिग्रेटेड (उद्योगाभिमुख) शिक्षण अनुभव देण्यास मदत करेल. यामध्ये जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंत्यांकडून लाईव्ह मार्गदर्शन, दर सहा महिन्यांनी अद्ययावत होणारा एआय-फर्स्ट अभ्यासक्रम, पहिल्या सेमिस्टरपासून प्रत्यक्ष कोडिंग व प्रॉडक्ट-बिल्डिंग स्प्रिंट्स, आणि उद्योग क्षेत्रातील संस्थापक, सीएक्सओ व आघाडीच्या प्रमुखांसोबत नियमित संवाद यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

विद्यार्थी तीन भविष्य-केंद्रित विशेष



शाखांमधून निवड करू शकतात:

* फुल स्टॅक एआय आणि क्लाउड इनोव्हेशन- यामध्ये एंड-टू-एंड सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, एआय ॲप्लिकेशन्स आणि क्लाउड-नेटिव्ह तंत्रज्ञानाचा समावेश आहे.
* एआय आणि क्वांटम कम्प्युटिंग- यामध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि उदयास येणाऱ्या क्वांटम कम्प्युटिंगच्या संकल्पना व उपयोजनांचे संयोजन आहे.
* एआय आणि जेनएआय इंजिनिअरिंग- हे प्रामुख्याने जनरेटिव्ह एआय, लार्ज लँग्वेज मॉडेल्स आणि नेक्स्ट-जनरेशन एआय प्रॉडक्ट डेव्हलपमेंटवर केंद्रित आहे.

टेक्निकल प्रशिक्षणाव्यतिरिक्त या प्रोग्राममध्ये सात सेमिस्टरचा स्टार्टअप ट्रॅक समाविष्ट करण्यात आला आहे, जो विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगच्या कौशल्यांसोबत उद्योजकता, नेतृत्व आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यास सक्षम करतो.

या प्रोग्राममधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपग्रॅडच्या करिअर सपोर्ट परिसंस्थेचा फायदा मिळेल, ज्यामध्ये ३००० पेक्षा जास्त हायरिंग पार्टनर्स आहेत. तसेच या प्लेसमेंट नेटवर्कने आर्थिक वर्ष २०२३ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान १,१०,००० हून अधिक प्लेसमेंट्स मिळवून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा रोजगार आणि करिअरच्या वाढीचा मार्ग अधिक प्रबळ झाला आहे.

या सहयोगाबाबत मत व्यक्त करत अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपचे चेअरमन आणि अजिंक्य डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ. अजिंक्य डीवाय पाटील म्हणाले, अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपमध्ये आमचा नेहमी विश्वास राहिला आहे की, शिक्षण हे भविष्यानुसार बदलले पाहिजे. हा सहयोग शैक्षणिक विश्वासार्हता आणि उद्योग क्षेत्रातील उपयुक्तता यांना एकाच व्यासपीठावर आणतो, ज्यामुळे विद्यार्थी मान्यताप्राप्त पदवी मिळवण्यासह वेगाने बदलणाऱ्या जगात प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्येही आत्मसात करतील.

अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीचे सीईओ विश्वा मोहन म्हणाले, भारतात इंजिनिअरिंगच्या गुणवत्तेची कधीच कमतरता नव्हती, कमतरता होती ती उद्योग क्षेत्राला प्रत्यक्षात काय पाहिजे याच्याशी सुसंगत असणाऱ्या इंजिनिअरिंग शिक्षणाची. ही तफावत दूर करण्यासाठी अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटीसोबत हा सहयोग करण्यात आला आहे: एक खरी पदवी, एक खरा कॅम्पस आणि खरी कौशल्ये ज्यांच्या जोरावर कंपन्या पहिल्या दिवसापासून नोकरी देतात. आम्ही ज्या युनिव्हर्सिटींसोबत काम करत आहोत, तिथे हेच मॉडेल आणत आहोत.

भारतात दरवर्षी जवळपास १.५ दशलक्ष इंजिनिअरिंग पदवीधर तयार होतात, तरीही रोजगाराची मोठी तफावत या क्षेत्रासमोर आव्हान म्हणून उभी आहे. इंजिनिअरिंग हा अजूनही देशातील सर्वात लोकप्रिय करिअर मार्गांपैकी एक असला तरी अनेक पदवीधरांकडे एआय, क्लाउड कम्प्युटिंग आणि प्रगत सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा अभाव दिसून येतो. भविष्यासाठी सज्ज असलेल्या मनुष्यबळाची मागणी झपाट्याने वाढत असताना अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी यांच्यामधील या सहयोगाचा अशा इंडस्ट्री-इंटिग्रेटेड आणि एआय-फर्स्ट इंजिनिअरिंग शिक्षण मॉडेलच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे.

# उगांवला आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**नाशिक लोकशास्त्र...**

निफाड प्रतिनिधी रामभाऊ आवारे

महाराष्ट्र शिक्षण संस्था, निमगाव जाळी संचलित छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय उगाव येथे रविवार दिनांक २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यात्प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य श्री कैलास गवळी सर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे आरोग्यदायी जीवनातील महत्त्व पटवून सांगितले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहते तसेच एकाग्रता, आत्मविश्वास व सकारात्मकता वाढीस लागते, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

कार्यक्रमात विद्यालयाचे क्रीडाशिक्षक श्री भालचंद्र सूर्यवंशी सर व श्री तांबोळी सर यांनी विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यांनी विद्यार्थ्यांकडूनही विविध योगासने करून घेत योगाचे महत्त्व समजावून सांगितले.या कार्यक्रमास पर्यवेक्षक श्री नंदाराम ढिकले सर, सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी विद्यार्थ्यांसमवेत योगासने करून योग दिनाचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण झाली असून निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. संपूर्ण परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता.

# 'मेहेकी यादे, बारिश गितोंके साथ' संगीत मैफिलीत रसिक श्रोते दंग

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिकरोड : एस व्ही कराओके सिंगिंग क्लब वतीने आयोजित संजय परमसागर व विनोद बर्वे प्रस्तुत ' मेहेकी यादे - बारिश गितोंके साथ ' या अवीट गोडी बहारदार पाऊस संगीत मैफिलीत नाशिकरोडकर रसिक श्रोते दंग झाले. रविवारी ( दि.२१ जुन ) सायंकाळी ६ वाजता ऋतुरंग भवन, नाशिकरोड येथे रंगलेल्या या मैफिलीत हिंदी व मराठी पाऊस गाण्यांचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत रंगत गेलेल्या या कार्यक्रमाला श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना दाद दिली. मैफिलीची सुरुवात गणेश स्तवनाने होऊन विनोद बर्वे यांनी ' या जन्मावर या जगण्यावर ' या गीताने प्रारंभ करत मेरे नैना सावन भादो, घन घन माला नभी दाटल्या, ये मौसम आया है, ढग दाटूनी येतात, तुमसा कोई प्यारा कोई, टिप टिप बरसा पानी, भीगी भीगी रातो मे, छुप गये सारे नजारे , रिमझिम रिमझिम रूमझूम रूमझूम, झील मिल सितारों का, सावनके झुले पडे, पतझड सावन बसंत



बहार, रिमझिम के गीत सावन, हाय रे हाय निंद नही आये, रिमझिम धुन गारवा, क्या मौसम आया है, हिरवा निसर्ग हा भोवतीने अशा हिंदी, मराठी पाऊस गीतांनी वातावरण भारावून टाकले.

या पाऊस गीतांच्या मैफिलीत गायक संजय परमसागर यासह विनोद बर्वे, गॉडविन लुईस, अतिथी गायक मोहनभाऊ पवार, दत्तात्रय पाटील, ललिता कनोजिया, वनिता आहेर, स्वप्ना गोखले, वैशाली राजपूत, जितेंद्र दिवे ,अनिल पांचाळ, प्रकाश महाले अनिल गुरव, गौतम भदाणे,प्रितम आमेसर, सुनयना भुजबळ, नीता देशमुख, रोहीत कुलकर्णी, शैलजा व सुरेंद्रनाथ सोनार यांनी आपल्या सुरेल आवाजात हिंदी व मराठी पाऊसगाणी सादर करीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उप-स्थित राहून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. यात किशोर वडनेरे, मोहन निकम, राम कुमावत, विठ्ठल श्रीवन्त, मनिष अहिरे, रितू पाटील, अनिल पगारे, ज्योती वाघमारे, सतीश कुलकर्णी, डॉ. माध-ुरी जाधव यासह रसिक उपस्थित होते. अतिथी गायक मोहनभाऊ पवार यांनी वैशाली राजपूत यांच्या समवेत आंखोसे तुने ये क्या केहे दिया या आणून रसिक स्रोत्यांची दाद मिळवली. ध्वनी व्यवस्था सुरेश काफरे आणि सूत्रसंचालन नीता देशमुख यांनी काव्यशैलीत खुमासदारपणे करत उपस्थित श्रोत्यांना खिळवून ठेवले.

**दररोज वाचा - सायंदैनिक नाशिक लोकशास्त्र**

सायंदैनिक 'नाशिक लोकशास्त्र' हे वृतपत्र मालक, प्रकाशक, संपादक भाऊसाहेब मधुकर हुजबंद यांनी मुद्रक - विकास प्रिंटिंग अँड कॅरियर्स प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्रमांक ३२, सकल सर्कल, एमआयडीसी सातपूर, त्र्यंबक रोड, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००७.येथे मुद्रित करून फ्लॅट क्र. १५, श्रीहरी दर्शन अपार्टमेंट, डोंगरगाव रोड, विंचूर, नाशिक, महाराष्ट्र - ४२२३०५. येथे प्रकाशित केले. (या अंकात व्यक्त झालेल्या जाहिरात, लेख, बातम्यांसाठी संपादक, प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही. निफाड न्यायालयीन कक्षेत. (मो. ८९९९९२१९९४) PRGI No. MHMAR/25/A4847

# डायलिसिसच्या चक्रातून मुक्ती; अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी किडनी प्रत्यारोपण; अवयवदानातून रुग्णाला मिळाली नवजीवनाची नवी संधी

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक : अंतिम अवस्थेतील किडनी विकारामुळे नियमित डायलिसिसवर अवलंबून असलेल्या एका रुग्णाला यशस्वी किडनी प्रत्यारोपणाद्वारे नव्या आयुष्याची संधी मिळाली आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे पार पडलेल्या या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला डायलिसिसच्या दीर्घ आणि कष्टदायक प्रवासातून मुक्ती मिळाली असून उत्तर महाराष्ट्रातील प्रगत किडनी उपचार सेवेमधील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे.

या रुग्णाला दीर्घकाळापासून किडनी विकाराचा त्रास होता आणि त्यासाठी नियमित डायलिसिस सुरू होते. वैद्यकीय तपासण्यांनंतर किडनी प्रत्यारोपण हा सर्वोत्तम उपचार पर्याय असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, रुग्णाच्या पत्नीने किडनी दान करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर संपूर्ण वैद्यकीय प्रक्रियेचे नियोजन करून यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले.

याबाबत माहिती देताना डॉ. विपुल गट्टाणी, वरिष्ठ नेफ्रॉलॉजिस्ट म्हणाले, किडनी निकामी झाल्यानंतर अनेक रुग्णांना नियमित डायलिसिसवर अवलंबून राहावे लागते. मात्र योग्य दाता उपलब्ध झाल्यास किडनी प्रत्यारोपणामुळे रुग्णाचे जीवनमान लक्षणीयरीत्या सुधारते. आज प्रत्यारोपणानंतर रुग्णाची प्रकृती चांगली असून त्यांना अधिक सक्रिय आणि स्वतंत्र जीवन जगण्याची संधी मिळणार आहे. डॉ. अभिजित मोरे यांनी सांगितले,

किडनी प्रत्यारोपण ही केवळ शस्त्रक्रिया नसून त्यामध्ये रुग्ण, दाता आणि वैद्यकीय टीम यांचा एकत्रित प्रवास असतो. योग्य नियोजन, सातत्यपूर्ण फॉलोअप आणि शस्त्रक्रियेनंतरची काळजी यामुळे उत्कृष्ट परिणाम साध्य होतात. या प्रकरणात रुग्णाची सुधारणा समाधानकारक आहे.

अवयवदानाबाबत जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित करताना डॉ. किशोर वाणी म्हणाले,



भारतात अजूनही अवयवदानाची गरज आणि उपलब्धता यामध्ये मोठी तफावत आहे. योग्य माहिती आणि जनजागृतीमुळे अनेक रुग्णांना वेळेत उपचार मिळू शकतात. अवयवदान ही समाजासाठी अत्यंत मौल्यवान देणगी आहे.

या यशस्वी उपचारामागील टीमवर्कविषयी बोलताना डॉ. श्याम तलरेजा यांनी सांगितले,

किडनी प्रत्यारोपणासारख्या जटिल प्रक्रियेमध्ये नेफ्रॉलॉजिस्ट, सर्जन, ॲनेस्थेशिया तज्ज्ञ, क्रिटिकल केअर टीम आणि नर्सिंग स्टाफ यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या बहुविशेषज्ञ सेवांमुळे अशा उपचारांमध्ये सातत्याने यश मिळत आहे.

या प्रसंगी उपस्थित असलेले डॉ. विजय कराडे, वरिष्ठ फिजिशियन तथा अध्यक्ष, नाशिक रोड फिजिशियन असोसिएशन यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन करताना सांगितले,

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल सातत्याने प्रगत वैद्यकीय सेवा, शैक्षणिक उपक्रम आणि Quaternary Care सुविधांच्या माध्यमातून नाशिकच्या आरोग्यसेवेला नवे आयाम देत आहे. किडनी प्रत्यारोपणासारख्या जटिल उपचारांचे यशस्वी व्यवस्थापन हे नाशिकसाठी अभिमानाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे महानगरांमधील आरोग्यसेवा आता स्थानिक स्तरावर उपलब्ध होत आहे.

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले,

प्रगत अवयव प्रत्यारोपण सेवा उत्तर महाराष्ट्रात उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. यशस्वी किडनी प्रत्यारोपण हा त्याच दिशेने टाकलेला आणखी एक भक्कम पाऊल आहे. रुग्णांना त्यांच्या शहरातच उच्च दर्जाची आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. या यशस्वी प्रत्यारोपणामुळे पुन्हा एकदा हे सिद्ध झाले आहे की, योग्य वैद्यकीय सुविधा, अनुभवी तज्ज्ञांची टीम आणि वेळेवर घेतलेले निर्णय यांमुळे गंभीर आजारांवरही यशस्वी मात करता येते. तसेच अवयवदानाविषयी सकारात्मक दृष्टीकोन आणि जागरूकता निर्माण करण्याची गरज या निमित्ताने अधोरेखित झाली.

****

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी नीट व जेईई परीक्षा, मोफत कोचिंगकरिता ३० जून पर्यंत अर्ज सादर करावेत – : प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक, दि. २३ जून (जिमाका वृत्तसेवा): एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, सिन्नर, येवला, चांदवड आणि निफाड या आठ तालुक्यांतील अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी नीट व जेईई स्पर्धा परीक्षांच्या मोफत कोचिंगसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी होणाऱ्या चाळणी परीक्षेसाठी १० वी परीक्षा उच्च गुणवत्तेसह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी ३० जून २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, नाशिकच्या प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

यासाठी १०० गुणांची चाळणी परीक्षा १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ब्रम्हाव्हॅली शैक्षणिक संकुल, त्र्यंबकेश्वर, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक येथे होईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय आश्रमशाळा बोपेगाव,ता. दिंडोरी, जि.नाशिक येथे इयत्ता ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश देण्यात येणार असून नामांकित शैक्षणिक संस्थेकडून नीट/ जेईई परीक्षेसाठी विनामूल्य कोचिंग देण्यात येणार आहे.

आवश्यक पात्रता

विद्यार्थी अनुसूचित जमातीचा व महाराष्ट्राचा रहिवासी असावा. मार्च २०२६ मध्ये इयत्ता १० वी परीक्षा ७० टक्के किंवा अधिक गुणांनी उत्तीर्ण असावा. प्रत्यक्ष प्रवेशाच्या वेळी जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांच्या अधिनस्थ शासकीय/ अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांचे आवेदनपत्र त्यांच्या आश्रमशाळेमार्फत सादर करावेत. इतर शाळांमधील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज शाळेतील मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, नाशिक, आदिवासी विकास भवन, नाशिक येथे ३० जून २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी व अर्जाच्या विहित नमुना प्राप्त करण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक येथे संपर्क साधावा, असेही प्रकल्प अधिकारी श्रीमती ठुबे यांनी कळविले आहे.

## जिल्हा न्यायालयात जागतिक योग दिन साजरा

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा): जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालयात जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक राहुल रोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सतीश हिवाळे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

योग शिक्षक अभिषेक जुन्नरकर यांनी सामूहिक योगाभ्यास, योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके घेतली. जिल्हा न्यायाधीश क्रमांक १ नाशिक, ए.के लाहोटी, जिल्हा न्यायाधीश क्रमांक ३ नाशिक, आर.एन. पांढरे, जिल्हा न्यायाधीश क्रमांक ५ नाशिक, एन.एल.मोरे, मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक, एस.ए.बाफना यांच्यासह जिल्हा न्यायालयातील न्यायिक अधिकारी, कर्मचारी , वकील यांनीही योग दिन कार्यक्रमात सहभाग नोंदविला.



## ‘आई तारी तिला कोण मारी’चा आशय अधिक प्रभावीपणे उलगडणारा ‘मर्दिनी’चा दमदार ट्रेलर प्रदर्शित

**नाशिक लोकशास्त्र...**

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या आशयप्रधान आणि भावनिकदृष्ट्या प्रभावी कथांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळताना दिसत आहे. समाजातील वास्तव, मानवी नातेसंबंध आणि संघर्ष यांना स्पर्श करणाऱ्या कथा प्रेक्षकांना अधिक जवळच्या वाटू लागल्या आहेत. अशाच एका हृदयस्पर्शी आणि तितक्याच थरारक कथानकाची उत्सुकता निर्माण करणाऱ्या ‘मर्दिनी’ या बहुप्रतिक्षित मराठी चित्रपटाचा दमदार ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. पोस्टर आणि टीझरनंतर प्रेक्षकांच्या मनात निर्माण झालेली उत्सुकता आता ट्रेलरमुळे आणखी वाढली असून, सोशल मीडियासह चित्रपटवर्तुळात ‘मर्दिनी’ची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे.




श्रेयस तळपदे प्रस्तुत, फ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि ओ डी आय ग्रुप निर्मित ‘मर्दिनी’ हा चित्रपट एका आईच्या भावविश्वातील सर्वात कोमल भावना आणि सर्वात भीषण संघर्ष यांचा प्रवास उलगडणारा सिनेमा आहे. लेकरांवर ओढवलेल्या संकटानंतर एका सामान्य आईच्या आयुष्यात घडणारी उलथापालथ आणि त्या संकटाविरुद्ध उभं राहताना तिच्यात जागृत होणारी असामान्य ताकद याची प्रभावी झलक ट्रेलरमध्ये पाहायला मिळते.

ट्रेलरची सुरुवात एका आनंदी, समाधानाने भरलेल्या कुटुंबापासून होते. आपल्या मुलीभोवती फिरणारं जग, तिच्या निरागस हास्यात स्वतःचं सुख शोधणारी आई आणि साधं-सोपं आयुष्य जगणारं कुटुंब... मात्र एका अनपेक्षित घटनेनंतर या सुखी आयुष्याला अचानक तडा जातो. परिस्थितीचं गांभीर्य वाढत जात असताना एका आईच्या मनात निर्माण होणारी असहायता, भीती आणि अस्वस्थता प्रेक्षकांना अक्षरशः अस्वस्थ करून सोडते. पण याच क्षणी तिच्यातील लढवय्या स्त्री जागी होते आणि सुरू होतो न्यायासाठीचा संघर्ष.

आई तारी तिला कोण मारी या प्रभावी आशयाला अधिक व्यापक रूप देत ट्रेलर मातृत्वाची वेगळी बाजू समोर आणतो. आपल्या लेकरांच्या रक्षणासाठी आई कोणत्याही मर्यादा ओलांडू शकते, कोणत्याही संकटाशी दोन हात करू शकते आणि गरज पडल्यास संपूर्ण व्यवस्थेलाही आव्हान देऊ शकते, हा संदेश ट्रेलरमधून प्रभावीपणे व्यक्त होतो. त्यामुळे हा चित्रपट केवळ एका आईची कथा न राहता प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याचा आणि जिद्दीचा गौरव करणारा ठरतो.

भावनिक प्रसंगांबरोबरच ट्रेलरमध्ये रहस्य आणि थराराचाही प्रभावी वापर करण्यात आला आहे. कथानकात दडलेली अनेक प्रश्नचिन्हं, न्यायाच्या शोधात सुरू असलेली धडपड, वाढत जाणारा तणाव आणि अंगावर काटा आणणारे प्रसंग यामुळे ट्रेलर शेवटपर्यंत खिळवून ठेवतो. प्रभावी पार्श्वसंगीत, वास्तववादी दृश्यरचना आणि संवादांमधून चित्रपटाचा गडद आणि भावनिक सूर प्रकर्षाने जाणवतो.

अभिनेत्री प्रार्थना बेहेरे हिने साकारलेली भूमिका या चित्रपटाचा आत्मा असल्याचं ट्रेलरवरून स्पष्ट होतं. एका प्रेमळ आईपासून संकटांशी लढणाऱ्या रणरागिणीपर्यंतचा तिचा प्रवास अत्यंत प्रभावीपणे पडद्यावर साकारताना दिसतो. तिच्या अभिनयातील भावनिक खोली आणि व्यक्तिरेखेतील ताकद प्रेक्षकांना निश्चितच भावनिकरीत्या गुंतवून ठेवणारी ठरणार आहे. अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले आणि बालकलाकार मायरा वैकुळ यांच्याही भूमिका कथानकाला अधिक परिणामकारक बनवताना दिसतात.

दिग्दर्शक अजय मयेकर यांनी आपल्या पहिल्याच चित्रपटातून भावना, सामाजिक वास्तव आणि थरार यांचा सुरेख मिलाफ साधल्याचं ट्रेलरमधून जाणवतं. निर्माती दिप्ती तळपदे यांच्या निर्मितीखाली साकारलेल्या या चित्रपटाच्या तांत्रिक बाजूदेखील तितक्याच मजबूत वाटतात. शब्बीर नाईक यांचे छायांकन, हितेश मोडक यांचे संगीत, अभिषेक शेठ यांचे संकलन आणि महाबळेश्वर नार्वेकर यांची पटकथा व संवाद यामुळे चित्रपटाची मांडणी अधिक प्रभावी झाली आहे.

मातृत्वाच्या भावविश्वाला संघर्षाची धार आणि न्यायाच्या लढ्याला भावनांची खोली देणारा ‘मर्दिनी’ हा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीस सज्ज झाला आहे. एका आईच्या सामर्थ्याची, प्रेमाची आणि जिद्दीची कथा सांगणारा हा बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, ट्रेलरनंतर चित्रपटाबद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून लासलगाव-पाटोदा-नगरसुल कॉँक्रीटीकरण रस्त्यासाठी ३४० कोटी निधी मंजूर

**नाशिक लोकशास्त्र....**

नाशिक :- राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून राज्याच्या पुरवणी अर्थसंकल्पातून लासलगाव-पाटोदा-नगरसुल राज्य महामार्गाच्या कॉंक्रिटीकरणासाठी तब्बल ३४० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली असून या रस्त्याची रुंदी १० मीटर असणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे येवला मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम होणार असून शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

लासलगाव ही आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ केंद्र म्हणून आ-ळखली जाते. लासलगाव-पाटोदा-नगरसुल हा मार्ग कृषी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असून या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात कांदा, भाजीपाला, धान्य तसेच इतर कृषी मालाची वाहतूक केली जाते. या रस्त्यावरील दळणवळण लक्षात घेऊन या मार्गाचे कॉंक्रिटीकरण व्हावे यासाठी मंत्री छगन भुजबळ यांचा राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता.

या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण झाल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत जलद आणि सुरक्षितपणे पोहोचविता येणार आहे. वाहतूक खर्चात बचत होणार असून मालाच्या वाहतुकीस लागणारा वेळही कमी होणार आहे. तसेच या मार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील उद्योग, व्यापार आणि आर्थिक व्यवहारांना चालना मिळणार आहे.

यापूर्वीही मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून पिंपळस ते येवला या महत्त्वाच्या चौपदरी कॉंक्रीटीकरण मार्गासाठी ५६० कोटी रुपये तसेच लासलगाव-विंचूर चौपदरी कॉंक्रीटीकरण रस्त्यासाठी १३२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून या रस्त्यांची कामे वेगाने सुरु आहे.

आता लासलगाव-पाटोदा-नगरसुल मार्गालाही कॉंक्रीटीकरण करण्यासाठी ३४० कोटी रुपयांची मंजुरी मिळाल्याने येवला-लासलगाव परिसरातील रस्ते विकासाच्या कामांना आणखी बळ मिळाले आहे. या सर्व प्रकल्पांमुळे येवला मतदारसंघ आणि परिसरातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधला जाणार असून दळणवळण व्यवस्था अधिक आधुनिक आणि सक्षम होणार आहे. शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी ही विकासकामे अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

# जागतिक योग दिनानिमित्त चालकांसाठी नाशिक डिस्ट्रिक्ट ट्रान्सपोर्ट असोसिएशन कडून विशेष योग शिबिर

## निरोगी चालक, सुरक्षित रस्ता, समृद्ध भारत हा संदेश देत शिबिराची उत्साहात सुरवात

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक :- जागतिक योग दिनाच्या निमित्ताने नाशिक डिस्ट्रिक्ट ट्रान्सपोर्ट असोसिएशन आणि नमोयोगा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक क्षेत्रातील चालक बांधवांसाठी आडगाव ट्रक टर्मिनल मध्ये योग दिवसाच्या एक दिवस आधीच विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये योग शिक्षक प्रतिमा फड-बोडके यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान यांचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच योगशिक्षक राजेंद्र फड यांनी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व आणि विशेषतः चालकांसाठी त्याचे फायदे याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी उपस्थित चालक बांधवांनी योगाभ्यासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि भविष्यात नियमित योग करण्याचा संकल्प केला. नाशिक डिस्ट्रिक्ट ट्रान्सपोर्ट असोसिएशन च्या वतीने समाजाच्या आणि देशाच्या प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका



बजावणाऱ्या चालकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वाहतूक क्षेत्रातील चालक हे देशाच्या अर्थचक्राला गती देणारे महत्त्वाचे घटक आहेत. रात्रंदिवस प्रवास,अनियमित आहार,अपुरी झोप, ताणतणाव आणि रस्त्यांवरील मर्यादित सुविधा अशा अनेक अडचणींना सामोरे जात असतानाही ते आपले कर्तव्य अत्यंत जबाबदारीने पार पाडत असतात. मात्र, समाजासाठी इतके महत्त्वाचे योगदान देणारा हा घटक अनेकदा दुर्लक्षित राहतो. याच पार्श्वभूमीवर चालकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सक्षम करण्यासाठी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पी.एम सैनी, चेअरमन राजेंद्र फड, सचिव बजरंग शर्मा, उपाध्यक्ष शंकर धनावडे, आर्थिक सल्लागार सुभाष जांगडा, सियाराम शर्मा, महावीर शर्मा, संजय जैन, राजेश इसरवाल, भगवान कटीरा आदी उपस्थित होते. योगाभ्यासामुळे चालकांना अनेक प्रकारचे आरोग्यदायी लाभ मिळू शकतात. नियमित योग केल्याने पचनशक्ती सुधारते, स्मरणशक्ती वाढते, दृष्टी अधिक चांगली राहण्यास मदत होते, राग आणि मानसिक ताण कमी होतो तसेच काम करताना येणारा थकवा आणि कंटाळा दूर होतो. त्यामुळे वाहन चालविताना एकाग्रता वाढून अपघातांची शक्यता कमी होण्यास मदत होते. त्यामुळे चालकांसाठी हा उपक्रम अतिशय महत्वाचा आहे.

- योगशिक्षक राजेंद्र फड

नमोयोगा फाउंडेशन ही संस्था चालकांचे आरोग्य सुदृढ राहावे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण मिळावे आणि रस्ते अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी सातत्याने कार्यरत आहे. योग, आरोग्य जनजागृती, प्रशिक्षण शिबिरे आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून चालकांमध्ये सुरक्षित वाहनचालना व निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचविण्याचे काम संस्था करत असल्याची माहिती योग शिक्षिका प्रतिमा फड-बोडके यांनी दिली. जागतिक योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम चालकांच्या आरोग्याबाबत समाजात सकारात्मक जागरूकता निर्माण करणारा ठरला. निरोगी चालक, सुरक्षित प्रवास आणि अपघातमुक्त भारत या संकल्पनेला बळ देणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास पात्र ठरत आहे.

# जिल्ह्यातील शेतकरी वर्गाने अपुऱ्या पावसात पेरणीची घाई टाळा

## जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे आवाहन

**नाशिक लोकशास्त्र**
शांतारामभाऊ दुनबळे

नाशिक -: राज्यात यंदाच्या मान्सूनवर 'एल निनो'चा प्रभाव दिसून येत असून जून महिन्यात जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत केवळ १०.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची माहिती द्यावी तसेच अपुऱ्या पावसावर पेरणीची घाई करू नये यासाठी व्यापक जनजागृती करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी कृषी विभागाला दिल्या आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक अभिमन्यू काशिद, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक भिवा लवटे, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ व विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत मॉन्सूनची सद्यस्थिती, एल निनो हवामान घटकाचा संभाव्य प्रभाव आणि खरीप हंगामावर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी प्रसाद म्हणाले की, पावसाची अचूक माहिती मिळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व हवामान केंद्रांची तपासणी करण्यात यावी. किमान ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस होऊन जमिनीत पेरणीयोग्य ओलावा निर्माण होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी टाळावी.

जिल्ह्यात आतापर्यंत ६ लाख ५५ हजार ८७९ शेतकऱ्यांची (८४ टक्के) ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची नोंदणी, ई-केवायसी आणि आधार सीडिंगची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच पीक विमा, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना आणि महाडीबीटीवरील प्रकरणे तत्काळ निकाली काढण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

# नांदुर मध्यमेश्वर अभयारण्यात २८ जून रोजी 'पावसाळीपूर्व पक्षी गणना'; वनविभागातर्फे निसर्गप्रेमींना सहभागाचे आवाहन

**नाशिक लोकशास्त्र....**

जागतिक दर्जाचे 'रामसर' स्थळ आणि महाराष्ट्राचे भरतपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील 'नांदुर मध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्य' येथे रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी भव्य 'पावसाळीपूर्व पक्षी गणना २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र वन विभाग ,नांदुर मध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्य यांच्या नियोजनातून हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविला जाणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी (ठऋज) हिरालाल चौधरी यांनी दिली आहे.

पक्षी गणनेचे उद्दिष्ट आणि महत्त्व

दरवर्षी पावसाळ्याच्या आगमनापूर्वी अभयारण्यातील जलाशयांची पाण्याची पातळी, पाणथळ जागांची सद्यस्थिती आणि उपलब्ध अन्नसाठा यानुसार पक्ष्यांच्या वावरात बदल होत असतात. या पार्श्वभूमीवर, अभयारण्यातील जैवविविधतेचा शास्त्रीय अभ्यास करणे, स्थानिक तसेच अद्याप मुक्काम ठोकून असलेल्या स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजातींची अचूक सद्यसंख्या नोंदवणे हा या गणनेचा मुख्य उद्देश आहे. या नोंदींमधून समोर येणारी आकडेवारी भविष्यात वन्यजीव संवर्धन, पर्यावरण समतोल आणि अभयारण्याच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण दस्तऐवज (ऊींर) ठरणार आहे. - हेमंत उबाळे , सहाय्यक वन संरक्षक

लोकसहभागातून संवर्धनाचा निर्धार

या पक्षी गणनेचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ तज्ज्ञांचाच



नव्हे, तर सर्वसामान्य निसर्गप्रेमींचाही सहभाग घेतला जाणार आहे. या शास्त्रीय व पर्यावरणपूरक उपक्रमामध्ये नाशिक जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पक्षी मित्र, निसर्गप्रेमी, वन्यजीव अभ्यासक, पर्यावरण क्षेत्रातील संशोधक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि बिगर शासकीय संस्थांच्या (छऋज) प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन वन विभागामार्फत करण्यात आले आहे.

लोकसहभागातून वन्यजीव संवर्धनाची चळवळ अधिक बळकट करणे हा यामागील मुख्य हेतू आहे. - कृष्णा भवर , उपवनसंरक्षक, वन्यजीव नाशिक

पक्षी गणनेचा सविस्तर कार्यक्रम व तपशील:

दिनांक: २८ जून २०२६ (रविवार)

वेळ: सकाळी ठीक ०७:०० वाजता

स्थान/ठिकाण: चापडगाव निसर्ग पर्यटन संकुल, ता. निफाड, जि. नाशिक.

आयोजक: नांदुर मध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्य, नाशिक

सहभागी होणाऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना:

१. वेळेचे बंधन: पक्षी निरीक्षणासाठी पहाटेची आणि सकाळची वेळ सर्वोत्तम मानली जाते. त्यामुळे गणनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व नागरिकांनी रविवारी सकाळी ठीक ७:०० वाजता चापडगाव येथील निसर्ग पर्यटन संकुलात उपस्थित राहावे.

२. साहित्य: पक्ष्यांची अचूक नोंद घेता यावी यासाठी इच्छुकांनी आपल्या सोयीनुसार कॅमेरा, नोंदवही (डायरी) आणि पेन सोबत ठेवावे.

३. पोशाख व शिस्त: निसर्गाशी एकरूप होणारे (उदा. हिरवे, तपकिरी किंवा फिकट रंगाचे) कपडे परिधान करावेत. अभयारण्याच्या क्षेत्रात फिरताना शांतता राखणे व प्लास्टिक कचरा न करणे बंधनकारक राहील.

या नाविन्यपूर्ण व वैज्ञानिक मोहिमेत सहभागी होऊन निसर्गाच्या या अद्भुत सफारीचा आणि पक्षी विश्वाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी हिरालाल चौधरी व वनविभागाच्या पथकाकडून करण्यात आले आहे.

- हिरालाल चौधरी,
वनपरिक्षेत्र अधिकारी (ठऋज)
नांदुर मध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्य, नाशिक
(महाराष्ट्र वन विभाग - वन्यजीव, नाशिक)

****